**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक १२ जुलै २०२४**

**ठळक बातम्या**

1. **विधान परिषदेच्या ११ जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी आज १०० टक्के मतदान- मतमोजणीस सुरुवात.**
2. **महाराष्ट्रात नॉन क्रिमीलेयरची आठ लाख रुपयांची वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढवण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात आल्याची अतुलसावे यांची विधानसभेत माहिती.**
3. **राज्याच्या वित्तव्यवस्थेचा २०२२-२३ आणि २०२३-२४ या दोन आर्थिक वर्षांचा अहवाल कॅगद्वारे आज विधानसभेत सादर.**
4. **वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला राज्यपालांची मंजुरी - विदर्भाच्या ६ जिल्ह्यातील सुमारे 3 पूर्णांक 71 लक्ष हेक्टर क्षेत्र येणार सिंचनाखाली.**

****

विधानपरिषद द्वैवार्षिक निवडणुक

विधान परिषदेच्या ११ जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी आज १०० टक्के मतदान झालं. सकाळी ९ ते संध्याकाळी चार वाजेपर्यंत विधानसभेतील सक्रिय २७४ आमदारांनी गुप्त मतदानाद्वारे मतदानाचा हक्क बजावला. मतमोजणीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली असून विजयी होण्यासाठी उमेदवारांना पहिल्या पसंतीची २३ मत मिळवणं आवश्यक आहे. विधान परिषदेच्या ११ जागांसाठी १२ उमेदवार रिंगणात आहेत. भाजपकडून पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे, राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे, शिवसेनेकडून माजी खासदार कृपाल तुमाणे आणि भावना गवळी, काँग्रेसकडून प्रज्ञा सातव, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मिलिंद नार्वेकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाठिंब्याने शेकापचे जयंत पाटील, ही निवडणूक लढवत आहेत.

विधानसभा

महाराष्ट्रातल्या विविध घटकांना शैक्षणिक प्रवेशासाठी असणारी नॉन क्रिमीलेयरची आठ लाख रुपयांची वार्षिक उत्पन्न मर्यादा वाढवण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे, अशी माहिती इतर मागास बहुजन कल्याण प्रवर्ग विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी आज विधानसभेत दिली. जनतेचं जीवनमान आणि वेतन स्तर उंचावल्यामुळे ही मर्यादा वाढवण्याची मागणी करण्यात येत होती. तर २०१३ सालच्या नवीन भूसंपादन कायद्याबाबत देशातल्या विविध उच्च न्यायालयांनी दिलेले निवाडे उपलब्ध करून घेऊन या महिना अखेरपर्यंत या कायद्यात सुधारणा करण्यासाठी कारवाई केली जाईल, अशी ग्वाही विखे पाटील यांनी दिली. याबाबतची लक्षवेधी सूचना प्रकाश सोळंके यांनी उपस्थित केली होती. राज्याच्या शहरी भागातील नक्षली कारवायांना पायबंद घालण्यासाठी अन्य राज्यांच्या धर्तीवर राज्य सरकारने गुरुवारी विधानसभेत विधेयक सादर केले. बेकायदेशीर कृत्य आखण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीला ७ वर्षांपर्यंत शिक्षा आणि पाच लाख दंडाची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे. बेकायदेशीर संघटनेला मदत केल्यास २ वर्षांची शिक्षा किंवा ३ लाखांपर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

विधानपरिषद अंतिम आठवडा प्रस्ताव

जनतेच्या पैशाचा अपव्यय करून राज्याला अधोगतीला नेण्याचं काम सरकार करत आहे अशी टीका विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज विधानपरिषदेत केली.अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेमध्ये ते बोलत होते. काही मोजक्या अधिकाऱ्यांसाठी आणि कंत्राटदारांसाठी काम करत असलेल्या सरकारनं जनतेला वाऱ्यावर सोडलं आहे, असं ते म्हणाले. कारवाई देखील विशिष्ट लोकांना लक्ष्य करूनच केली जाते असं सांगत राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेला कोणीही वाली नाही अशी टीका दानवे यांनी केली. लाडकी बहीण योजनेअंतर्गत पंधराशे रुपये देऊन भागणार नाही असं सांगत या महिलांच्या सुरक्षेसाठी सरकार

अपयशी ठरल्याचं ते म्हणाले. शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे सुनील शिंदे यांनी सरकारच्या धोरणांवर टीका करत  या प्रस्तावावरील चर्चेला सुरवात केली. तर भाजपचे प्रसाद लाड यांनी चर्चेत सहभागी होत, सरकारच्या कल्याणकारी योजनांची प्रशंसा केली. जनतेला दिलासा देण्यासाठी सरकार सातत्यान लोकहिताच्या योजना राबवत असल्याचं ते म्हणाले.

पत्रकार आंदोलन

माध्यमकर्मी कल्याणकारी मंडळासाठी मिडिया असोसिएशन ऑफ इंडियाच्या अध्यक्ष, पत्रकार शीतल करदेकर बुधवारपासून मुंबईत आझाद मैदान इथं आमरण उपोषणाला बसल्या होत्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज त्यांच्या विशेष दालनात शीतल करदेकर यांची भेट घेऊन 'पत्रकारांसाठी महामंडळ' बनवावं या प्रमुख मागणीवर चर्चा केली. 'पत्रकारांसाठी महामंडळ बनावं यासाठी येत्या आठवड्याभरात चर्चा करून मार्ग काढू. आता आपलं आमरण उपोषण मागं घ्यावं,' अशी विनंती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शीतल करदेकर यांना केली. त्यानंतर  आमरण उपोषण स्थगित झालं.

नीट

नीट परीक्षेतील पेपर फुटी प्रकरणी केंद्रीय तपास पथक अर्थात सीबीआयनं राकेश रंजन उर्फ रॉकी याला अटक केली आहे. पेपर प्रकरणात तो मुख्य सुत्राधार असून त्याला दहा दिवसांच्या सीबीआय कोठडीत पाठवण्यात आलं आहे. राकेश रंजन हा पेपर फुटीप्रकरणातील प्रमुख आरोपी संजीव मुखिया याचा जवळचा साथीदार आहे. मुखिया हा फरार असून त्याचा ठावठिकाणा राकेश रंजनकडून मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी तपास यंत्रणेनं झारखंडच्या हजारीबाग इथल्या ओएसिस शाळेचे मुख्याध्यापक अहसानुल हक आणि उपमुख्याध्यापक इम्तियाज यांच्यासह १२ जणांना अटक केली आहे. सीबीआय तसंच विविध राज्यांतील पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत. दरम्यान नीट

परीक्षा गैरव्यवहार प्रकरणी सीबीआय कोठडीत असलेला आरोपी एन. गंगाधरन याच्या कोठडीत लातूरच्या न्यायालयानं आणखी चार दिवसांची वाढ केली आहे. त्याची कोठडी काल संपल्यानं त्याला न्यायालयात हजर केलं होतं. दरम्यान, या प्रकरणी लातूरमध्ये गुन्हा दाखल असलेला ईरंना कोनगलवार हा अद्याप फरार असून त्याला अटक करण्याचं मोठं आव्हान सीबीआयपुढं आहे.

विजयलक्ष्मी बिदरी

'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजने'च्या लाभासाठी आतापर्यंत नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांच्या ग्रामीण आणि शहरी भागातून ३ लाख १ हजार १३४ अर्ज प्राप्त झाले आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी जास्तीत-जास्त महिलांनी नोंदणी करण्याच आवाहन, नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी केलं आहे. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी राज्यात 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजने' साठी सुरु असलेल्या नोंदणीचा आज दुरदृश्य संवाद प्रणालीद्वारे राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिकांचे आयुक्त यांच्याकडून आढावा घेतला. या योजनेसाठी नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांमधील ग्रामीण आणि शहरी भागातील मदत केंद्रांवर दिनांक ११ जुलै पर्यंत ७५ हजार ४९९ ऑनलाईन तर २ लाख २५ हजार ६३५ ऑफलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. नागपूर मनपान एकूण १० प्रशासकीय प्रभाग आणि ३८ निवडणूक प्रभागांमध्ये एकूण ४८ मदत केंद्र उभारली आहेत. विहित कालावधीत या योजनेची अमलबजावणी करण्यासाठी शासकीय सुट्टीच्या दिवशी दि. 13 आणि 14 जुलै रोजी सरकारी कार्यालये सुरु राहणार असून महिला लाभार्थी या दिवशी संबंधित मदत केंद्रावर अर्ज दाखल करू शकतात.

उपराष्ट्रपती

असमानता रोखण्यासाठी शिक्षण ही सर्वात प्रभावी परिवर्तनशील यंत्रणा आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज मुंबईत केलं. नरसी मोनजी व्यवस्थापकीय शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करत होते. या संस्थेनं गेल्या अनेक वर्षांपासून देशाचं भविष्य घडवण्याच्या कामात मोठा हातभार लावल्याबद्दल त्यांनी प्रशंसोद्गार काढले. वैदिक काळापासून भारताला उच्च शिक्षणाची मोठी परंपरा असून प्राचीन भारतातल्या महाविद्यालयांनी समाजाला दिशा देणारी मूल्यं जपलीआहेत, असं उपराष्ट्रपती म्हणाले.

कॅग अहवाल

मूळ अर्थसंकल्पातल्या तरतुदींइतका खर्च झालेला नसताना राज्य सरकारनं पुरवणी मागण्या मांडल्या. हे प्रकार टाळण्यासाठी योग्य अर्थसंकल्पीय मार्गांचा अवलंब करायला हवा असं निरीक्षण कॅग अर्थात नियंत्रक आणि लेखापालांच्या अहवालात नोंदवलं आहे.राज्याच्या वित्तव्यवस्थेचा २०२२-२३ आणि २०२३-२४ या दोन आर्थिक वर्षांचा अहवाल विधानसभेत आज सादर झाला. त्यात हे निरीक्षण नोंदवलं गेलं आहे. राज्य सरकारच्या मालकीच्या सातत्यानं तोट्यात असलेल्या कंपन्यांचा कारभार सुधारत नसेल तर त्या कंपन्या बंद करण्याची शिफारसही कॅगनं केली आहे. राज्य सरकारच्या मालकीच्या ११० कंपन्यांपैकी ४७ कंपन्यांनी १ हजार ८३३ कोटींहून अधिक नफा कमावला. त्यातला ९० टक्के नफा हा केवळ १० कंपन्यांनी कमावला होता. काही कंपन्या वेळेत आर्थिक अहवाल सादर करत नसल्याबद्दलही कॅगनं नाराजी व्यक्त केली आहे. गेल्या ५ वर्षात वेतन, निवृत्तीवेतन आणि कर्जावर व्याज यावर होणाऱ्या खर्चात सरासरी ११ टक्के वाढ झाली. २०२२-२३ या आर्थिक वर्षात वित्तीय खर्चाच्या तुलनेत ५४ टक्क्यांहून अधिक रक्कम या गोष्टींवर खर्च झाली होती. यामुळं प्राधान्य क्षेत्राकडे लक्ष देता येत नसल्याचं कॅगनं अहवालात नमूद केलं आहे.

वैनगंगा-नळगंगा

विदर्भातील 6 जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी तत्वतः मंजुरी दिली आहे. सुमारे 80,000 कोटींचा हा नदीजोड प्रकल्प आहे. या प्रकल्पाला तातडीन मंजुरी देण्यात यावी, अशी विनंती करण्यासाठी 9 जुलै रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली होती. त्यानंतर आज त्याला राज्यपालांनी तत्वतः मान्यता दिलेली असून  तस पत्र जलसंपदा विभागाला दिल आहे.  वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला आणि बुलढाणा या विदर्भातील 6 जिल्ह्यांसाठी  वरदान ठरणार आहे. या प्रकल्पामुळे 3 लाख 71 हजार  हेक्टरवर क्षेत्र सिंचनाखाली येईल. पिण्याच पाणी तसच सिंचनाचे मोठे प्रश्न यातून सुटणार आहेत.  या नदीजोड प्रकल्पाच्या कालव्याद्वारे सौर ऊर्जा निर्मिती होणार आहे.

******